ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue No. 1

# भारताच्या आयात निर्यात धोरणाच्या सद्य स्थितीचा अभ्यास

**डॉ. बी. एन. शिंगाडे[1], वैष्णवी गायकवाड[2]**

*संगमनेर नगरपालिका आर्ट. डी. जे. मालपाणी कॉमर्स. बी. एन. सारडा सायन्स महाविद्यालय (स्वयत्त महाविद्यालय) संगमनेर. (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)*

***Corresponding Author:*** *डॉ. बी. एन. शिंगाडे*

**DOI - 10.5281/zenodo.15093314**

**प्रस्तावना:**

भारताच्या आयात निर्यात धोरणाचा इतिहास प्राचीन काळापासून सुरू आहे. प्राचीन काळात भारताचा व्यापार जगाच्या विविध भागांशी होत असे. भारतातून मसाले, कापड, रंग, धातू इत्यादी वस्तू निर्यात होत असत तर परदेशातून सोने, चांदी, घोडे इत्यादी वस्तू आयात होत असत.

मध्ययुगीन काळातही भारताचा व्यापार सुरूच होता. या काळात भारतातून मसाले, कापड, रंग, धातू इत्यादी वस्तू निर्यात होत असत तर परदेशातून सोने, चांदी, घोडे इत्यादी वस्तू आयात होत असत.

आधुनिक काळात भारताचे आयात निर्यात धोरणात मोठे बदल झाले आहेत. १९९१ साली भारताने आर्थिक सुधारणा केल्या आणि त्यानंतर भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला. भारताचे आयात निर्यात धोरण देशाच्या आर्थिक सुरक्षेसाठीही महत्त्वाचे आहे. भारताचे आयात निर्यात धोरण देशाला परदेशी चलनाची कमतरता टाळण्यास मदत करते. यामुळे देशाला आपल्या परदेशी कर्जाची परतफेड करणे सोपे जाते.

**सध्याचे धोरण आणि त्याचे उद्देश:**

भारताचे आयात निर्यात foreign trade policy -FTP (परकीय व्यापार धोरण) देशाचा आर्थिक विकासात महत्वपूर्ण भूमीका बजावते हे धोरण देशाच्या व्यापार वाढीला चालना देण्यासाठी रोजगार निर्मिती करण्यासाठी आणि आर्थिक स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना आखते.

**सध्याची स्थिती:**

नवीन परकीय FTP भारताने 2023-2028 साठी व्यापार धोरण (FTP) जाहीर केली आहे या धोरणामुही निर्यात व्यवसाय सुलभ करण्यावर भर देण्यात आला आहे. सरकारणे निर्यात वाढीसाठी विविध प्रोत्साहन योजना सुरु केल्या आहेत यामध्ये यामध्ये GST दरात कपात केल्या, निर्यात सबसिडी आणि विशेष आर्थिक क्षेत्रांना प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे. आयात-निर्यात प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम बनवण्यासाठी सरकार डिजिटल प्लॅटफॉर्मचा भारत वापर करत आहे सरकारचे आत्मनिर्भर मोहीम अंतर्गत देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आयात कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**आयात-निर्यात धोरणाची उद्दीष्ट्ये:**

1. देशातील उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि इतर संरक्षण देने आणि : आयात शुल्क प्रतिबंधाद्वारे देशांतर्गत उत्पादनाला आणि त्यामुळे देशातील उद्योगांना वाढव- व्यास मदत करणे.
2. राष्ट्रीय सुरक्षा सुनिश्चित करणे: रणनीतिकदृष्टया महत्त्वा- च्या आयातीवर नियंत्रण ठेवून देशाचर्ची सुरक्षा सुनिश्चित करणे
3. रोजगार निर्मिती: देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देऊन अधिक रोजगार निर्मिती करणे.

4. विदेशी चलन संचय वाढवणे: निर्यात वाढवून विदेशी चलन संचय वाढवणे.
5. उपभोक्त्यांना स्वस्त उपलब्ध करून देणे काही विशिष्ट वस्तूंच्या आयातीवर नियंत्रण शिथिल करून उपभोक्त्यांना स्वस्त वस्तू उपलब्ध करून देणे.
6. तंत्रज्ञान हस्तांतरण प्रोत्साहित करणे: परदेशी गुंतवणूक आकर्षित करून तंत्रज्ञान हस्तांतरण प्रोत्साहित करणे.
7. वेश्विक व्यापार वाढवणे इतर देशांशी व्यापार करार करून वैश्विक व्यापार वाढवणे,

**आयात-निर्यात धोरणाचे भारताच्या आर्थिक विकासातील महत्व**:

भारताच्या आर्थिक विकासात आयात-निर्यात धोरणांची महत्वपूर्ण भूमिका आहे. ही धोरणे देशाच्या आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती आणि जगभरातील देशांशी व्यापार संबंध मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**भारताची अर्थव्यवस्था आणि जागतिक व्यापारात तिचे स्थान**:

भारताची अर्थव्यवस्था सध्या जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. आपल्या मोठ्या लोकसंख्येच्या बळावर आणि वाढत्या युवकवर्गामुळे भारताची अर्थव्यवस्था भविष्यात अजून अधिक उंचावण्याची शक्यता आहे.

**भारताची अर्थव्यवस्था: एक संक्षिप्त आढावा:**

जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्थांपैकी एक: क्रयशक्ती समानतेच्या दृष्टीने भारताची अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमांकाची आहे. वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था: भारताचा आर्थिक विकासदर गेल्या काही वर्षांत सरासरी 7% च्या आसपास राहिला आहे. विविध क्षेत्रांचा समावेश: भारताची अर्थव्यवस्था शेती, उदयोग आणि सेवा या सर्व क्षेत्रांवर आधारित आहे.

**संशोधन पध्दती:**

सदर शोध निबंध दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी विविध पुस्तके, विविध लेख, तसेच शासकीय, निमशासकीय विषयावर केलेल्या अभ्यासाचा वापर सदर शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

**आयात-निर्यात धोरणावर आधारित सिद्धांत:**

तुलनात्मक लाभ सिद्धांत-(Theory of Comparative Advantage) या सिध्दांतानुसार, प्रत्येक देशाला त्याच्या तुलनेने कमी खर्चात उत्पादन करण्यात येणाऱ्या वस्तूंची निर्यात करावी आणि तुलनेने जास्त खर्चात उत्पादन करण्यात येणाऱ्या वस्तूंची आयात करावी.

**हॅश-ओलिन सिध्दांत:**

(Heckscher-Ohlin Theorem) देश त्या उत्पादनाची निर्यात करतात ज्यांच्या उत्पादनासाठी त्यांच्याकडे च प्रचंड प्रमाणात उपलब्ध असलेले उत्पादन घटक असतात.

**स्टॉपर- सॅम्युएलसन सिद्धांत :**

या सिद्धांतानुसार मुक्त व्यापारामुळे प्रचंड प्रमाणात उपलब्ध असलेल्या उत्पादन घटकाच्या मालकांच्या उत्पन्नात वाढ होते. तर दुर्मिळ उत्पादन घटकाच्या मालकाच्या उत्पन्नात घट होते.

**संरक्षणवाद** :

संरक्षणवाद हा एक आर्थिक सिद्धांत आहे ज्यानुसार सरकार आपल्या देशातील उद्योगाचे संरक्षण करण्यासाठी आयात वस्तूंवर शुल्क आणि कोटे लावते.

**मुक्त व्यापार :**

मुक्त व्यापार हा एक आर्थिक सिद्धांत आहे ज्यानुसार देशांमध्ये वस्तू आणि सेवांची निर्बंधशिवाय मुक्तपणे देवाणघेवाण होते

**जागतिक व्यापारात भारताचे स्थान:**

भारत जागतिक व्यापारात एक महत्त्वपूर्ण देश आहे. भारतातून अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात केली जाते, तर अनेक वस्तू आणि सेवांची आयातही केली जाते. भारताची निर्यात आणि आयात या दोन्हीमध्ये वाढ होत आहे.

**निर्यात:**

भारतातून मुख्यत्वे कापड, दागिने, अभियांत्रिकी सामग्री, रसायने, चामडे इत्यादी वस्तूंची निर्यात केली जाते.

**आयात:**

भारतात मुख्यत्वे कच्चे तेल, यंत्रसामग्री, मौल्यवान खडे, खत, रसायने इत्यादी वस्तूंची आयात केली जाते.

**व्यापार भागीदार:**

भारताचे प्रमुख व्यापार भागीदार अमेरिका, चीन, संयुक्त अरब अमीराती, युनायटेड किंग्डम, हाँग काँग इत्यादी देश आहेत.

**सध्याच्या आयात निर्यात धोरणाच्या स्थितीचे विश्लेषण:**

भारत हा जगातला सर्वात मोठा लोकशाही देश असून तो आर्थिकदृष्ट्याही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आयात-निर्यात ही आर्थिक वाढीचा एक महत्वाचा भाग आहे. भारताचा सध्याचा आयात-निर्यात धोरणाचा मुख्य उद्देश व्यापार सुलभ करणे, आर्थिक चालना आणि देशातील उद्योगांना प्रोत्साहन देणे हा आहे.

सरकार विविध सुधारणा पयून व्यापार प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न करत आहेत. यात सीमाशुल्क प्रक्रीया वेगवान करणे, काद कागदपत्रांची सख्या कमी करणे आणि डिजिटल

पद्धतीचा वापर वाढवणे यांचा समावेश आहे. सरकार विविध योजना आणि प्रोत्साहन देऊन देशातील उद्योगांना प्रोत्साहन देत आहे यात निर्यात सबसिडी, कर सवलती आणि विशेष आर्थिक क्षेत्रांची निर्मिती याचा समावेश आहे.

भारत विविध देश्यांशी व्यापार करार करून आंतरराष्ट्रीय व्यापर वाढविन्याचा प्रयत्न करत आहे यात व्यापार करार, प्राधान्य व्यापार करार आणि आर्थिक भागीदारी करार यांचा समावेश होतो. सरकार पुढील काळातही आयात-निर्यात धोरणात सुधारणा करत राहणार आहे यात कृषी उत्पादनाच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे, सेवा क्षेत्रातील व्यापार वाढविणे आणि डिजिटल व्यापाराला चालना देणे यांचा समावेश होतो.

भारताची निर्यात मुख्यतः पेट्रोलिअम उत्पादने, दगड-जेम, औषधे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादींवर आधारीत आहे.

भारताची आयात मुख्यतः कच्चे तेल, सोयाबीन तेल, मशीनरी आणि इलेक्ट्रॉनिक , उपकरणे तेल, इत्यादींवर आधारित आहे.

भारताची व्यापार तूट सध्या चिंतेचा विषय आहे म्हणजेच भारताची आयात निर्यातीपेक्षा जास्त आहे. कोविड 19 महामारी मुले जागतिक व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे त्यामुळे भारताच्या आयात निर्यातीवर परिणाम झाला आहे.

**आयात-निर्यात धोरणाचे यश आणि अपयश:**

आयात निर्यात धोरणातील यश आणि अपयश पुढीलप्रमाणे आहे

**1. आयात-निर्यात धोरणाचे यश:**

आयात निर्यात धोरणा- मुळे देशाची आर्थिक वृद्धी झाली आहे देशातील उत्पादन वाढले आहे रोजगार निर्मिती झाली आहे. आणि परकीय चलन मिळाले आहे. यामुळे देशातील लोकांना स्वस्त आणि

चांगल्या दर्जाचे उत्पादने मिळत आहेत. यामुळे देशातील बेकारी कमी झाली आहे यामुळे देशाची आर्थिक स्थिरता वाढली आहे.

**2. आयात-निर्यात धोरणाचे अपयश:**

आयात निर्यात धोरणांमुळे व्यापारात तूट झाली आहे याचा अर्थ देशातून जास्त आयात होत आणि कमी निर्यात होते. आयात-निर्यात धोरणामुळे देशात महागाई वाढली आहे.

**आयात निर्यात धोरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम:**

**आयात निर्यात धोरणाचे सकारात्मक परिणाम:**

1. अर्थव्यवस्थेला चालनाः आयात निर्यात धोरणामुळे देशातील उत्पादन वाढते रोजगार निर्माण होतात आणि देशाची आर्थिक सुधारते.
2. उपभोक्त्यांना स्वस्त वस्तू : आयातमुळे देशात विविध प्रकारच्या वस्तू स्वस्त दरात उपलब्ध होतात.
3. नवीन तंत्रज्ञान: आयात निर्यात धोरणामुळे देशात नवीन तंत्रज्ञान येते आणि त्याचा उपयोग उत्पादन वाढविण्यासाठी केला जातो.
4. स्पर्धा वाढतेः आयातमुळे देशातील उत्पादकांना स्पर्धा करावी लागते, आणि त्यामुळे ते गुणवत्तापूर्ण उत्पादने बनवण्याचा प्रयत्न करतात
5. आंतरराष्ट्रीय संबंध सुधारतातः आयात-निर्यात धोरणां- मुळे देशांमधील व्यापार वाढतो आणि त्यामुळे आंतर- राष्ट्रीय संबंध सुधारतात.

**आयात निर्यात धोरणाचे नकारात्मक परिणाम:**

1. स्थानिक उद्योगांवर परिणाम स्वस्त आयतीमुळे स्थानिक उद्योगांना स्पर्धा करावी लागते आणि काही उद्योग बंद पडण्याची शक्यता असते.
2. रोजगार कमी होणे काही उद्योग बंद पडल्याने रोजगार कमी होऊ शकतो कमी होऊ काठी उद्योग बंद पडल्याने शकतात.
3. विदेशी चलन संकट : जर आयात खूप झाली तर देशाची देशाचे विदेशी चलन संकट निर्माण होऊ शकते.
4. देशाची आर्थिक स्थिती अनिश्चितः जागतिक बाजारपेठेत होणाऱ्या होतो बदलांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.
6. पर्यावरणावर परिणाम: अमर्याद उत्पादन आणि वापरामुळे पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

**भारता समोर असलेले अव्हाने:**

भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असली तरी त्यासमोर अनेक अव्हाने आहेत यात बेरोजगारी दारिद्र्य, असमानता, पर्यावरणीय समस्या इत्यादीचा समावेश होतो.

**सारांश:**

भारताची आयात निर्यात धोरणे सतत बदलत राहतात सरकारच्या विविध धोरणांची आणि जागतिक परिस्थितीचा यावर मोठा प्रभाव पडतो. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया यासारख्या पहलामुळे भारताला उत्पादन केंद्र बनवण्याची दिशा मिळाली आहे GST च्या लागू झाल्याने व्यापसाला गती मिळण्याची अपेक्षा आहे मात्र कोविड १९ महामारीमुळे जागतिक व्यापारावर येणाऱ्या आव्हानांना तोंड देणे हा एक मोठा प्रश्न आहे.

**संदर्भ :**

1. https://nayizindagi.com/import-export-items-list-india-hindi/
2. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय वित्त व्यवस्था